**जिल्हयातील अस्थिव्यंग दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वाटप शिबिरांचे आयोजन.**

**शिबिरांचा लाभ घेण्याचे जिल्हा परिषदेचे आवाहन..!**





**नाशिक** - जिल्हयातील अस्थिव्यंग आणि दिव्यांगांना खासगी संस्था आणि जिल्हा परिषदेच्या सहकार्यातून कृत्रिम अवयव उपलब्ध होणार आहे. एलिम्को संचालित एस. आर. ट्रस्टच्या वतीने जिल्हयात एडिप योजनेंतर्गत १६ ते ३० जून या कालावधीत सर्व १५ तालुक्यात यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, आज नाशिक तालुकयात आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात ४२ अस्थिव्यग लाभार्थी यांना हात पाय व कॅलिपर्स बसवण्यात आले. जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को ) यांच्या वतीने सदर दिव्यांग लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाभुत साधने इत्यादीचे वाटप करण्यात येते.. शिबिरात एलिम्कोचे तज्ज्ञ अस्थिव्यंग, दिव्यांगांना कृत्रिम हातपायांसाठी मोजमाप घेवून जागेवरच कॅलिपर्सचे वितरण करण्यात येणार आहे. दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील गटविकास अधिकारी सह समन्वय म्हणुन जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक १६ जून ते ३० जुन २०२५ या कालावधीमध्ये संपूर्ण जिल्हयात तालुकानिहाय शिबिरे घेण्यात येणार असून लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव वाटप करण्यात येणार आहे,

जिल्हायात आयोजित करण्यात येत असलेल्या या शिबिराचा अस्थिव्यंग असलेल्या दिव्यांगांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. दरम्यान जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासाठी अस्थिव्यंग व्यक्तींनी आपले आधार कार्ड, रेशनकार्ड व वैद्यकीय प्रमाणपत्र (यूडीआयडी) यासह आपापल्या भागातील नियोजित प्रमाणपत्रासह ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत नाशिक पंचायत समितीमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ४२ अस्थिव्यग लाभार्थी यांना हात पाय व कॅलिपर्स बसवण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी श्रीमती सोनिया नाकोडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भरत चौधरी व सुदाम पाळदे आदि यावेळी उपस्थित होते.

**शिबिरांचे वेळापत्रक याप्रमाणे-**

१७ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय बागलाण

१८ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय चांदवड

१९ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय निफाड

२० जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सिन्नर

२१ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय इगतपुरी

२२ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय दिंडोरी

२३ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय पेठ

२४ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सुरगाणा

२५ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय देवळा

२६ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय कळवण

२७ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय येवला

२८ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय मालेगाव

२९ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय नांदगाव

३० जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय त्र्यंबकेश्वर